# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/उदयान/ 615 /२०२४-२५ दिनांक :- 13/12/2024

प्रति,
मा. सिस्टम मॅनेजर
माहिती व तंत्रज्ञान विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय:- विकास आणि पर्यावरण यांचा समन्वय साधून मिरा - भाईंदर महानगरपालिकेचे नागरिकांसाठी निरतंर लोकहिताच्या उपक्रमांची अंमलबजावणी सुरुच असलेबाबत प्रेसनोट प्रसिध्द करणेबाबत**

उपरोक्त विषयान्वये विकास आणि पर्यावरण यांचा समन्वय साधून मिरा - भाईंदर महानगरपालिकेचे नागरिकांसाठी निरतंर लोकहिताच्या उपक्रमांची अंमलबजावणी सुरुच असलेबाबत सोबत जोडलेली प्रेसनोट मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- प्रेसनोट प्रत.

H.S.M.
(हंसराज मेश्राम)
उप मुख्य उद्यान अधिक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

E:\2024-25\Lettar all/Lettar

Scanned with OKEN Scanner

# प्रेस नोट

## विकास आणि पर्यावरण यांचा समन्वय साधून मिरा-भाईंदर महानगर पालिकेचे नागरिकांसाठी निरंतर लोकहिताच्या उपक्रमांची अंमलबजावणी सुरूच

मिरा-भाईंदर महानगर पालिका प्रदूषण-मुक्त, हरित आणि पर्यावरणस्नेही वातावरण निर्माण करण्यासाठी नेहमीच संवेदनशील राहिली आहे. पायाभूत सुविधांच्या विकासासोबतच, पर्यावरणाचा समतोल राखण्याचे महत्वाचे कार्य करण्यात मिरा - भाईंदर महानगरपालिका कायमच अग्रेसर राहिली आहे. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक, श्री संजय श्रीपतराव काटकर(भा.प्र.से) यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणसंपन्न व प्रदूषणमुक्त उपक्रमांची अंमलबजावणी पालिका क्षेत्रांत निरंतर सुरूच आहे.

मिरा - भाईंदर महानगरपालिका शहरात हवेची गुणवत्ता राखण्याच्या दृष्टिकोनातून तसेच पर्यावरण पूरक निसर्गरम्य वातावरण रहावं यासाठी झाडे दत्तक योजना यासारख्या यशस्वी उपक्रमांच्या माध्यमातून नागरिक, सामाजिक संस्था, शासकीय आणि निमशासकीय संस्था, पर्यावरण प्रेमी, पत्रकार व विकासकांना आवाहन केले असता श्रीमती गिता जैन (माजी आमदार), श्री. हर्षद ढगे (पर्यावरणप्रेमी तथा संस्थापक - फॉर फ्युचर संस्था), श्री. संजय श्रीपतराव काटकर(भा.प्र.से) - आयुक्त तथा प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, महानगरपालिकेतील सर्व अतिरिक्त आयुक्त, सर्व उपायुक्त व वर्ग - २ चे सर्व अधिकारी, मे. आगाखान एजन्सी (सामाजिक संस्था), मे. सुदामा कन्सट्रक्शन (विकासक), मे. निसर्ग लॅन्डस्केप सर्विसेस (मनपा ठेकेदार), मे. बालाजी इन्फ्रा प्रोजेक्टस (मनपा ठेकेदार), मे. हिरावती इन्टरप्रायजेस (मनपा ठेकेदार) व मे. शितल एग्रो एण्ड लॅन्डस्केप (मनपा ठेकेदार) यांनी झाडे दत्तक योजनेमध्ये 2523 झाडांची लागवड करून त्यांच्या निगा व देखभालीसाठी सदर योजनेमध्ये सक्रिय सहभाग नोंदवलेला आहे. सदर झाडे दत्तक योजनेत केंद्र शासनाच्या अख्यातरीत येणा-या भारतीय रेल्वे अंतर्गत पश्चिम रेल्वेने ही प्रस्ताव सादर करुन 3684 झाडे लागवड व निगा देखभालीसाठी सक्रिय सहभाग नोंदवलेला आहे.

विकासाच्या प्रक्रियेत काही ठिकाणी विकासाच्या दृष्टीने वृक्षांची काढणी जरी करण्यात आली असली तरी, त्याच प्रमाणात महानगरपालिका नवीन वृक्षांची लागवड करीत आहे. विकास आणि पर्यावरण यांचा समन्वय साधून, मिरा - भाईंदर महानगरपालिका शहरात नवनवीन उपक्रम राबवित आहे. भविष्यात, शहराच्या विकासासोबतच, पर्यावरणाचा समतोल राखून प्रदूषण मुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी महापालिका कटीबद्ध आहे. नागरिकांसाठी एक निरोगी, प्रदूषणमुक्त आणि हरित वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने मिरा-भाईंदर महानगरपालिका यापुढे ही अशीच कार्यशील राहील.

Scanned with OKEN Scanner